**वाचा** :- १)म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील ज्ञापन आरोग्य/अस्था४/४२/२०१६ दि.२१/१/२०१६
२) म.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, नाशिक यांचेकडील नेमणुक आदेश क्रमांक आरोग्य /अस्था४/ १०२४/२०१६ दि.२९/८/२०१६
३) सहाय्यक आयुक्त (चौकशी),नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-१९४/२०१६ दि.२७/२/२०१७
४) या कार्यालयाची अंतिम कारणे दाखवा नोटीस क्रमांक आरोग्य/अस्था४/३३१/२०१७ दि.३/७/२०१७
५) श्री.महाले आरोग्य सेवक यांचा अं.का.दा.नोटीसीस खुलासा दि.१७/७/२०१७
६) या कार्यालयाची मंजुर टिपणी दिनांक :- १४ / ११ /२०१७

---

**नाशिक जिल्हा परिषद, नाशिक**
जा.क्र.आरोग्य/अस्था४/४६७/२०१७
नाशिक दिनांक: १४ / ११ /२०१७

**आदेश**

श्री.आर.आर.महाले आरोग्य सेवक प्रा.आ.केंद्र बा-हे ता.सुरगाणा येथे कार्यरत असताना दि.०१/०२/२०१५ पासुन आजपोवतो कामी अनधिकृत गैरहजर आहेत.कामी अनधिकृत गैरहजर असल्याने ज्ञापन क्र.आरोग्य/अस्था४/४२/२०१६ दि.२१/१/२०१६ अन्वये खालीलप्रमाणे खातेचौकशी सुरु करण्यात आली.

१) कामी दि.०१/०२/२०१५ ते आजपावेतो अनधिकृत गैरहजर राहणे.

२) अनधिकृत रित्या गैरहजर राहुन श्री. महाले यांनी आदीवासी भागातील जनतेस आरोग्य सेवेपासुन वंचीत ठेवणे.

३) कार्यालयाने दिलेल्या कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा न देणे व वरिष्ठांच्या पत्रव्यवहाराची दखल न घेणे .

प्रस्तुत ज्ञापन व परिशिष्ट १ ते ४ हे श्री.आर.आर.महाले, आरोग्य सेवक (पु) यांना बजाविणेत आल्याने विहीत मुदतीत खुलासा सादर केलेला नसल्याने प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील)नियम १९६४ चा नियम ६ (३) नुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक यांचे कडील आदेश क्र आरोग्य /अस्था४/१०२४/२०१६ नाशिक दि.२९/८/२०१६ अन्वये सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांची नेमणुक करणेत आलेली होती.

सहाय्यक आयुक्त (चौकशी) नाशिक विभाग नाशिक यांचेकडील पत्र क्र. पत्र क्र.विशा-४/खाचौ/सीआर-१९४/२०१६ दि.२७/२/२०१७ अन्वये चौकशी अहवाल प्राप्त झाला आहे. चौकशी अहवालात सर्व आरोप सिद्ध झाल्याने नमुद केलेनुसार इकडील अंतिम कारणे दाखवा नोटीस आरोग्य/अस्था४/३३१/२०१७ दि.३/७/२०१७ अन्वये श्री.आर.आर.महाले,आरोग्य सेवक (पु) यांना महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ भाग तीन - चे नियम ४ (७) नुसार **जिल्हा परिषद नाशिक सेवेतुन बडतर्फ का करणेत येवु नये?याबाबत विचारणा करण्यात येवुन खुलासा मागविणेत आला होता.**

प्रस्तुत अंतिम कारणे दाखवा नोटीसीस श्री.आर.आर.महाले आरोग्य सेवक (पु) यांनी खुलासा दि.१७/७/२०१७ रोजी सादर केलेला आहे.सदरचा खुलासा असमाधानकारक असल्याने तसेच यापुर्वी श्री.महाले आ.सेवक कामी दि.१/५/२०११ ते २६/२/२०१२ या कालावधीत अनधिकृत गैरहजर होते त्या खातेचौकशीत त्यांचे प्राप्त चौकशी अहवालानुसार त्यांना तीन वेतनवाढी पुढील वेतनवाढीवर परिणाम होणार नाही अशा रितीने बंद करणेची शिक्षा देणेत आली. तसेच दुस-या वेळेस दि.१/८/२०१३ ते दि.२६/८/२०१४ पावेतो अनधिकृत गैरहजर कालावधी होते त्याखातेचौकशीत त्यांचे प्राप्त चौकशी अहवालानुसार त्यांना मुळ वेतनावर आणण्याची शिक्षा देणेत आलेली आहे.सदर वस्तुस्थिती पाहता श्री.महाले यांना वारंवार गैरहजर राहणेची सवय असल्याचे सिद्ध होते म्हणुन सदर प्रकरणी नियुक्ती प्राधिकारी या नात्याने मी.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक **महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे भाग-तीन कलम ४(५) नुसार प्राप्त अधिकाराचा वापर करुन श्री.आर.आर.महाले आरोग्य सेवक यांना सक्तीने सेवा निवृत्त करणेची शिक्षा देत आहे.**

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.आर.आर.महाले, आरोग्य सेवक (पु) यांचे मुळसेवापुस्तकात घेण्यात यावी.

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद नाशिक**

**प्रति,**

**श्री.आर.आर.महाले आरोग्य सेवक (पु),प्रा.अ.केंद्र बा-हे त.सुरगाणा**

**व्दारा:- गटविकास अधिकारी पंचायत समिती सुरगाणा.**

**प्रत:- गटविकास अधिकारी पंचायत समिती सुरगाणा.**

२/- समवेत आदेशाच्या ३ प्रती जोडलेल्या असुन त्यापैकी १ प्रत श्री.महाले,आरोग्य सेवक(पु) यांना बजावून दुसऱ्या प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेऊन सदरची प्रत इकडेस सादर करावी.

**प्रत:- अस्थापना विभाग -४ आरोग्य विभाग जि.प.नाशिक**

**प्रत:- माहीती व प्रसिद्धी कक्ष (आय टी सेल) साप्रवि जि.प.नाशिक यांना जि.प.संकेतस्थळावर प्रसिद्धी करणेसाठी**

(दीपक कुमार मीना)
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**जिल्हा परिषद नाशिक**